# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 22.10.2024** **वार – मंगळवार**

---

**अधिसूचना**

येत्या 29 ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. 30 ऑक्टोबरला अर्जांची छाननी होईल आणि 4 नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. विधानसभा निवडणुकीसाठी 20 नोव्हेंबरला मतदान होईल आणि 23 नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

**प्रशिक्षण**

दरम्यान विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाची तयारी सुरू आहे. स्वीप कार्यक्रमा अंतर्गत ठिकठिकाणी मतदार जागृती अभियान राबवलं जात आहे. तसंच निवडणूक यंत्रणेतील अधिकाऱ्यांना प्रशिक्षणही दिलं जात आहे. आंबेगाव विधानसभा मतदारसंघामध्ये अवसरीच्या शासकीय तंत्रनिकेतन इथं सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांचं प्रशिक्षण नुकतंच पूर्ण झालं. निवडणूक निर्णय अधिकारी गोविंद शिंदे यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिलं.

**जल पुरस्कार**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत राष्ट्रीय जल पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं. यामध्ये महाराष्ट्राला विविध श्रेणीत पाच पुरस्कार मिळाले. उत्कृष्ट महानगरपालिका श्रेणीमध्ये पुणे महानगर पालिकेला तिसरा क्रमांक मिळाला. पुणे महापालिकेचे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, आणि पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी हा पुरस्कार स्वीकारला. नागरी संस्थांच्या श्रेणीतही पुण्यातल्याच बायफ विकास संशोधन फाउंडेशनला पहिला पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**ससून**

पुण्यातील ससून रुग्णालयात आनुवंशिक आजारांवरील उपचार आणि संशोधनासाठी एक स्वतंत्र विभाग सुरू करण्यात येणार आहे. त्यामध्ये सिकल सेल, जन्मतः असलेला हायपोथायरॉइडिझम, बॅलेसेमिया यासह आवश्यक सर्व तपासण्या केल्या जातील. या योजनेसाठी निवड झालेलं ससून हे राज्यातलं पहिलं सरकारी रुग्णालय आहे, असं रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉक्टर एकनाथ पवार यांनी म्हटलं आहे. तपासण्या, आजारांचं निदान, उपचार, संशोधन, याबरोबरच या विभागात समुपदेशनही करण्यात येणार आहे.

**डेंग्यू-चिकनगुनिया**

पुणे शहरात डेंग्यू आणि चिकनगुनिया यासारख्या कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव वाढला आहे. गेल्या महिनाभरात शहरात डेंग्यूचे 492 संशयित रुग्ण आढळून आले; त्यातील 30 जणांना डेंग्यूचं निदान झालं आहे. चिकनगुनियाचेही 261 रुग्ण आढळले आहेत. चिकनगुनियाच्या रुग्णसंख्येत वाढ होत असतानाच रुग्णांमध्ये वेगळी आणि

तीव्र लक्षणे दिसून येत आहेत. डासांमुळे पसरणाऱ्या आजारांचा प्रादुर्भाव वाढू लागल्याने महापालिका आवश्यक उपाययोजना करत आहे. शहरात विविध ठिकाणी डास प्रतिबंधक औषधांची फवारणी सातत्याने सुरू असल्याची माहिती पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाने दिली आहे.

**नाकाबंदी**

मद्यपी वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्याच्या दृष्टीनं पुणे शहरात रोज रात्री नाकाबंदी केली जाणार आहे. त्यासाठी वाहतूक पोलिसांनी 27 ठिकाणं निश्चित केली आहेत. या कारवाईसाठी सहायक पोलीस आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली. बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यासाठी दररोज रात्री 11 ते पहाटे तीनपर्यंत शहरातील वेगवेगळ्या भागांत नाकाबंदी करून वाहनचालकांची तपासणी करण्यात येणार आहे. या मोहिमेत सहायक पोलीस आयुक्तांसह 125 पोलीस कर्मचारी सहभागी होणार आहेत.

**निषेध**

राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समिती आवारातील शेत मालावर बाजार शुल्क आकारलं जात असल्याबद्दल पुणे मर्चंट चेंबरने निषेध नोंदवला आहे. राज्यात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचार संहिता लागू आहे; त्यामुळे हा निर्णय मागे घेता येणार नसला, तरी नवं सरकार सत्तेवर आल्यानंतर हे शुल्क मागे घ्यावं अशी मागणी पुणे मर्चंट चेंबरनं केली आहे. या संदर्भात व्यापाऱ्यांची नुकतीच बैठक पार पडली.

**सायकलिंग**

सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र या संघटनेनं तिसऱ्या महाराष्ट्र राज्य ट्रॅक सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेचं आयोजन नुकतंच पुण्यात केलं होतं. यात पुणे जिल्हा संघाने सर्वसाधारण अजिंक्यपद पटकावलं. म्हाळुंगे बालेवाडी इथल्या क्रीडा संकुलात पार पडलेल्या या स्पर्धेत पुणे संघाने 14 सुवर्ण, 7 रौप्य आणि 6 कास्य पदकांसह एकंदर 97 गुण मिळवत सर्वसाधारण विजेतेपद पटकावलं. क्रीडा प्रबोधिनी पुणे संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं. मुलांच्या गटात पुणे क्रीडा प्रबोधिनीच्या सिद्धेश घोरपडे याला दोन सुवर्ण पदकं मिळाली, त्याला सर्वोत्कृष्ट खेळाडूचा किताबही मिळाला; तर मुलींमध्ये 2 सुवर्ण आणि 1 रौप्य पदक पटकावणारी आभा सोमण सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली.

**हवामान**

पुणे शहर आणि परिसरात आज कमाल तापमान 33, तर किमान तापमान 21 पूर्णांक 5 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्या आकाश अंशतः ढगाळ राहून कमाल तापमान 34 अंशांच्या आसपास राहील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**